# “जातीय विषमता आणि लिंगभेद : कालकुंद्री गावाचे व्यष्टी अध्ययन”

प्रा.आर.पी. चव्हाण प्रा.शोभा एस्. पाटील

समाजशास्त्र विभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

घोषवारा :प्रस्तुत शोधाबिंधामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील कालकुंद्री गावातील सवर्ण आणि आुसूचित जाती, लिंगभेद यासंदर्भात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक बदलांचा शोध घेण्याच्या दृष्टीा गावाचे व्यष्टी अध्यया केले आहे. गावाची ािवड सहेतुक ामुाा ािवड पद्धतीद्वारे केली आहे. या गावाची ािवड करण्याचे मुख्य कारण म्हणजे चंदगड तालुक्यात कालकुंद्री गावात प्राथमिक शाळा सुरू झाली आहे. सा २०१४ मध्ये या शाळेला १५० वर्षे पूर्ण होणार आहेत.भारतीय समाजव्यवस्था ही जातीसंस्थेवर आधारीत आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा दर्जा हा तिच्या जातीवरूा व लिंगावरूा ािश्चित केला आहे. एक जात ही दुसऱ्या जातीपेक्षा स्वतःला श्रेष्ठ मााते. त्याप्रमाणे समाजात पुरूष श्रेष्ठ आणि स्त्रिया काष्ठि मााल्या जातात. या काष्ठि वर्गाला मात्र समाजातील विशेष हक्क व अधिकारांपासूा वंचित ठेवले जाते. याचाच विचार करूा कालकुंद्री गावात शिक्षणाचा प्रचार व प्रसार होऊादेखील गावातील सवर्ण जाती व आुसूचित जाती यांच्यामध्ये जातीभेद पाळला जातो. त्यांच्यातील परस्पर संबंध हे श्रेष्ठ काष्ठि स्वरूपाचे आहेत. सोईस्कर ामुाा ािवड तंत्राचा वापर करूा सवर्ण जातीच्या २५ कुटुंबांची व आुसूचित जातीच्या २५ कुटुंबांची उत्तरदाते म्हणूा ािवड केली.

**प्रस्तावना** :भारतीय समाजव्यवस्था ही जातीसंस्था व वर्ण व्यवस्थेवर आधारित आहे. जातीसंस्था ही सामाजिक संस्था आहे. परंतु या संस्थेस हिंदू धर्माचा आधार आहे. हिंदू धर्मातील प्रत्येक व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या जातीचा सदस्य म्हणूनच ओळखले जाते. विशेष महत्वाची बाब म्हणजे भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरून ओळखला जातो. जाती व्यवस्थेचे विश्लेषण करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर नमूद करतात की, “जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानतेवर आधारित आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे आणि मधल्या जाती या उच्च जातीपेक्षा कनिष्ठ व कनिष्ठ जातीपेक्षा श्रेष्ठ आहेत. जाती पद्धती ही श्रेणीपद्धत असून त्यात उच्च जातीचा अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो.” डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यते संबंधीचे समाजशास्त्रीय अध्ययन केले. त्यांच्या मते अस्पृश्य हे हिंदू धर्माच्या जातीव्यवस्थेच्या बाहेरचे आहेत. त्यामुळे त्यांना अस्पृश्य मानले होते. अस्पृश्य लोकांवर प्राचीन काळांपासून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बंधने लादली गेली होती. याच अस्पृश्यांना दलित, मागासवर्गीय असेदेखिल म्हणतात. भारतीय संविधानात अस्पृश्य जातीचा अनुसूचित जाती असा उल्लेख करण्यात आला आहे. अनुसूचित जाती ही संज्ञा सर्वप्रथम सायमन कमिशनने वापरली व तीच पुढे १९३५ च्या कायद्यात अंतर्भूत करण्यात आली. हिंदू समाजातील जाती संस्थेविषयी भिन्न मते प्रचलित असली तरी अनुसूचित जातींना समाजात नीचतम स्थान होते. शैक्षणिक व व्यावसायिक निर्बंधांमुळे या जाती सर्वच बाबतीत मागासलेल्या राहिल्या. स्वातंत्र्योत्तर काळात शासकीय ध्येय-धोरणे व योजना आणि वाढत्या औद्योगिकरणाचे समाजरचनेवर झालेले परिणाम यामुळे अनुसूचित जातीची प्रगती होण्यास सहाय्य झाले. तथापि अनुसूचित जातीची सामाजिक अपंगता पूर्णपणे नष्ट करण्यासाठी नव्या मूल्यांचा स्विकार, कर्तव्यदक्ष शासकीय अधिकारी व जागृत लोकमत यांचीही आवश्यकता आहे. मागासवर्गीय व सवर्ण समाजामध्ये असणारी दरी कमी व्हावी, समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून शासनामार्फत आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यात आले आहे. तसेच आंतरजातीय विवाहित दांपत्यास प्रोत्साहनपर रू.५०,०००/- अर्थसहाय्यतेचा

धनाकर्ष पती-पत्नी यांच्या संयुक्त नावाने जमा करण्यात येतो.भारतीय समाजव्यवस्थेत जातीयता ही स्थायी स्वरूपाची विषमता निर्माण करणारी आहे आणि लिंगभेद ही संकल्पना स्त्री आणि पुरूष यांच्यातील जैविक भिन्नत्व दर्शविणारी आहे. जन्म घेतलेले नवजात अर्भक हे सुरुवातीला जैविक प्राणी असते. परंतु समाजीकरणाच्या माध्यमातून त्यांच्यावर भिन्न भिन्न संस्कार करून हाडामासांच्या त्या गोळ्याला स्त्री किंवा पुरूषात परावर्तित केले जाते. भारतात व्यक्तीचा दर्जा हा जातीच्या आधारावर जसा निश्चित केला जातो. तसाच लिंगाच्या आधारावर निश्चित केला जातो. म्हणजेच स्त्री-पुरूष विषमता पाळली जाते. म्हणजेच लिंगानुसार पुरूषांचा दर्जा श्रेष्ठ आणि स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. हिंदू धर्मात पितृऋण फेडण्यासाठी आणि कुटुंबाचा वंश पुढे चालविण्यासाठी मुलगा जन्माला येणे महत्वाचे मानले जाते. त्यामुळे मुलगा जन्माला आल्यास आई-वडीलांसह सर्वांना आनंद होतो. याउलट मुलीच्या जन्मामुळे कोणालाही आनंद होत नाही. मुलीला कुटुंबावरील भार समजला जातो. तिला परक्याचे धन मानले जाते. काही कुटुंबात तर मुलीचा जन्म झाल्याबरोबर तिला मारून टाकले जाते. तसेच गर्भजलाचे लिंग जाणून घेतले जाते. गर्भ जर स्त्री असेल तर गर्भ पाडण्याची प्रवृत्ती आढळून येते.स्त्री-भ्रूण हत्या होण्याच्या कारणांचा विचार केल्यास स्त्रिला दास्यत्व, दासी मानले आहे. स्त्रिची शारीरिक व सामाजिक असुरक्षितता, हुंडा देणे-घेणे प्रथा, निर्णय घेण्याची क्षमता नसणे, प्रत्येक गोष्टीसाठी लहानपणापासूनच स्त्री-पुरूष असमानता तिच्या मनावर बिंबवणे, हे तुझे काम नाही, हे करू नको इ. मुळे स्त्री असुरक्षित झाली आहे. त्यामुळेच ती न्यूनगंडाखाली वावरत आहे. जरी जग २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असले तरी रोज वर्तमानपत्रात विवाहितेचा हुंड्यासाठी छळ, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार, वांझोटी म्हणून दुसरे लग्न करणे इ. बातम्या नेहमी वाचतात. व कदाचित या सर्व स्त्रियांना आपल्या पोटातील मुलगी जन्माला येऊ नये व जगू नये या विचारांनी या असुरक्षित जगात त्याला येऊच द्यायचे नाही. असा निर्णय घेतात.

संशोधन पद्धती :प्रस्तुत शोध निबंधासाठी निवडलेली समस्या आणि अवलंबिण्यात आलेली संशोधन पद्धती याविषयी थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे -

**समस्यासूत्रण :**कालकुंद्री गावातील सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती, लिंगभेद या संदर्भात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक बदलांचा शोध घेणे ही प्रस्तुत अभ्यासासाठीची समस्या आहे.

अभ्यासासाची उद्दीष्ट्ये :अ) कालकुंद्री गावातील सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.ब) कालकुंद्री गावातील जातीय विषमतेनुसार सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करणे.क) कालकुंद्री गावातील लिंगभेदानुसार स्त्रियांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जांचा अभ्यास करणे.

संशोधन क्षेत्र **:**प्रस्तुत अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील कालकुंद्री गावाची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. कालकुंद्री गावाची निवड सहहेतू नमुना निवड पद्धतीद्वारे केली आहे.

कालकुंद्री गावाची हेतूतः निवड करण्याचे कारण : चंदगड तालुक्यातील कालकुंद्री गावात सर्वात प्रथम सन १८६४ मध्ये प्राथमिक शाळा सुरू झाली आहे. या शाळेला सन २०१४ मध्ये १५० वर्षे पूर्ण होणार आहेत. या १५० वर्षांच्या कालावधीत गावात शिक्षणाचा प्रसार होऊनदेखील जातीय विषमता आणि लिंगभेद आढळून आला. याचाच अभ्यास करण्यासाठी गावाची निवड केली.संशोधनासाठी कालकुंद्री गावातील ग्रामपंचायतीमधून मिळालेल्या २००१ च्या अहवालानुसार गावात एकूण ६७५ इतकी कुटुंबे आहेत. सोईस्कर नमुना निवड तंत्राचा वापर करून सवर्ण जातीच्या २५ कुटुंबाची व अनुसूचित जातीच्या २५ कुटुंबाची उत्तरदाते म्हणून निवड केली. अभ्यासाची उद्दीष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून प्राथमिक स्वरूपाची महिती

संकलित करण्यासाठी एका मुलाखत अनुसूचीचा वापर करून गावातील ५० कुटुंबातील महिला उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती संकलीत करण्यात आली. तसेच तथ्य संकलनासाठी व्यक्तिगत निरिक्षण तंत्र पद्धतीचा अवलंब करण्यात आला. कालकुंद्री गावाला दि.२५ जानेवारी २०१३ ते १० फेब्रु.२०१३ पर्यंत पाच वेळा भेटी दिल्या. १ फेब्रु. ते ५ फेब्र. या कालावधीत कालकुंद्री गावात राहून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने नमुन्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्यात आली. प्राथमिक माहिती स्त्रोतामध्ये संशोधकाने स्वतः कालकुंद्री गावाला भेटी देऊन केलेले निरीक्षण, घेतलेल्या मुलाखती, मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने मिळविलेले माहिती इ. चा वापर प्रस्तुत शोधनिबंधासाठी करण्यात आला. दुय्यम माहिती स्त्रोतामध्ये इंटरनेटवरून मिळविलेली माहिती व ग्रामपंचायत कार्यालयातील अहवाल इ. चा वापर केला.

**कालकुंद्री गावाचा परिचय :**कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील ताम्रपर्णी नदीवर वसलेले कालकुंद्री गांव. या गावाचा मुख्य व्यवसाय शेती असून, उस व भात ही दोन मुख्य पिके घेतली जातात. गावाची २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३०४४ इतकी आहे. त्यामध्ये पुरूषांची संख्या १४८९ व स्त्रियांची संख्या १५५५ इतकी आहे. गावात पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांची संख्या ही अधिक आहे. गावातील मागासवर्गीय लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण १७% आहे. गावात अनुसूचीत जातीची एकूण ४० इतकी कुटुंबे आहेत. ग्रामीण क्षेत्र असलेल्या चंदगड तालुक्यातील कालकुंद्री या खेडेगावात सन १८६४ साली सर्वप्रथम प्राथमिक शाळा सुरू झाली असून, सन २०१४ मध्ये या शाळेला १५० वर्षे पूर्ण होणार आहेत. तालुक्यातील साक्षरतेच्या बाबतीत कालकुंद्री हे गांव प्रथम क्रमांकावर आहे. गावातील ताम्रपर्णी नदी बारमाही वहात असलेने गावाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दर्जा सुधारलेला आहे. परंतु ज्यांच्याजवळ स्वतःची शेतजमीन नाही आणि आजही मजूरीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांचा मात्र आर्थिक, सामाजिक, शैक्षणक दर्जा सुधारलेला नाही. **सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती यांच्यातील परस्पर संबंध :**सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती यांच्यातील परस्पर संबंध हे श्रेष्ठ-कनिष्ठ दर्जावर अवलंबून आहेत. सवर्ण जाती या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या सबल आहेत. परंतु अनुसूचित जातीचा सामाजिक दर्जा हा निम्न स्वरूपाचा आहे. शैक्षणिक दर्जा मागासलेला आहे. आणि आर्थिकदृष्ट्या काही कुटुंबे सुधाललेली आहेत. अन्यथा उर्वरीत दारीद्र्यरेषेखाली येतात. सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती यांच्यामध्ये असलेला सामाजिक भेद जातीय विषमता दर्शविणारा आहे. आजही गावातील मंदीरात अनुसूचित जातींच्या लोकांना प्रवेश दिला जात नाही. तसेच सार्वजनिक विहीरीवर पाणी ओढण्यास मनाई केली जाते. म्हणजे सवर्ण जाती आणि अनुसूचित जाती यांच्यातील परस्पर संबंध हे उच्च-नीच स्वरूपाचे असल्याचे आढळून आले.

**सामाजिक व आर्थिक स्थिती :**गावतील सवर्ण जातीचा सामाजिक दर्जा हा श्रेष्ठ मानला जातो. कारण त्यांच्याजवळ स्वतःची शेतजमीन असल्यामुळे आर्थिक स्थिती चांगली आहे. त्यामुळेच त्यांना गावात सामजिक प्रतिष्ठा लाभलेली आहे. सवर्ण जातींमध्ये शैक्षणिक प्रगती झाल्यामुळेच् त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावलेला आहे. सवर्ण जातीच्या २५ उत्तरदात्यांच्या मालकीची एकूण शेतजमीनीनुसार केलेल्या वर्गीकरणामध्ये १३ उत्तर दात्यांकडे ५ एकर शेतजमीन आहे, ७ उत्तरदात्याकंडे ४ एकर शेतजमीन आहे. तर ५ उत्तरदात्यांकडे ३ एकर शेतजमीन आहे. परंतु अनुसूचित जातींचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, २५ उत्तरदात्यांपैकी २० उत्तरदात्यांकडे आजही शेतजमीन नाही. परंतु त्यापैकी ८ उत्तरदाते दुसऱ्याची खंडाने शेती करतात. तसेच ५ उत्तरदात्यांकडे स्वतःची शेतजमीन आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे त्या कुटुंबातच फक्त उच्च शिक्षण घेतलेली मुले आढळून आली.अनुसूचित जातीचा सामाजिक दर्जा हा निम्न स्वरूपाचा आहे. कारण गावात शैक्षणिक परिस्थित चांगली असूनही अनुसूचित जातीच्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी असलेल्या विहीरीवर पाणी ओढण्यास मनाई केली जाते. ही सद्यस्थिती आहे. सवर्ण जातीच्या स्वयंपाकघरात अनुसूचित जातीच्या

लोकांना प्रवेश दिला जात नाही. तसेच सवर्ण जातीचे लोक अनुसूचित जातीच्या कुटुंबातील पाणी तर घेत नाहीतच तसेच त्यांच्या घरात जाऊन भोजनदेखील करत नाहीत. यावरून गावात आजही अस्पृश्यता पाळली जाते हे लक्षात आले. अनुसुचित जातीतील मुला-मुलींच्या विवाहाच्या प्रसंगी सवर्ण जातीच्या लोकांनी स्वतः भोजन तयार केले तरच ते भोजन करतात. अन्यथा अनुसूचित जातींनी बनविले असेल तर ते भोजन करत नाहीत. गावातील या दोन्ही जातींमध्य पुरूषप्रधान संस्कृती असल्याचे आढळून आले. त्यांच्या कुटंबावर आजही पुरूषांचीच सत्ता चालते. स्त्रिया आर्थिकदृष्या परावलंबी आहेत. अधिकारात त्यांना पुरूषांबरोबरीचा वाटा दिला जात नाही. मुलगा हा वंशाचा दिवा समजला जातो. सवर्ण जातीच्या एका कुटुंबात सुनेला मूल होत नसल्यामुळे तिला सोडून दिले आहे. तसेच अनुसूचित जातीमधील एका कुटुंबात आठवा श्रीकृष्ण जन्माला येईल या आशेपोटी आज आठ मुलींना जन्म दिला आहे. गावातील सवर्ण जातीतील उच्च विभूषित कुटुंबातील उच्च शिक्षण घेतलेल्या एका मुलीने आंतरजातीय विवाह केल्यामुळे तिच्या वडीलांचा ह्रदयविकाराच्या धक्याने मृत्यू झालेला आहे. त्या दिवशीपासन ते आजतागायत त्या मुलीला कुटुंबात येऊ दिले जात नाही. उच्च शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेल्या मुलींना स्वतःचा जोडीदार निवडण्याचे देखील स्वातंत्र्य दिले जात नाही.

**शैक्षणिक स्थिती :**दिडशे वर्षांच्या कालावधीत गावात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होऊनदेखिल म्हणावा तसा गावातील लोकांनी शिक्षणाचा फायदा करून घेतला नाही. सवर्ण जातीच्या २५ कुटुंबाचा अभ्यास केल्यानंतर की, १५ कुटुंबात उच्च शिक्षण घेतलेले लोक आहेत. उर्वरीत १० कुटुंबात शिक्षण घेतलेले आहे पण ते जेमतेम आहे. २५ कुटुंबांचा शैक्षणिक दर्जा सुधारित असल्याचे दिसून आले. सवर्ण जातीचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून ते आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊ शकतात. परंतू अनुसूचित जातींना शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागा ठेवलेल्या असून देखील त्यांचा शैक्षणिक दर्जा आजही सुधारलेला नाही. अनुसूचित जातीच्या प्रगतीसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांचा लोकांनी फायदा घेतलेला नाही. अनुसूचित जातीतील ५ ते ६ कुटंबांची शैक्षणिक स्थिती सुधारलेली आहे. उर्वरीत कुटुंबातील लोक मजूरी करत असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे पुरेसे लक्ष देत नाहीत. तसेच शिक्षणासाठी लागणारा पुरेसा पैसा त्यांच्या जवळ नाही असे दिसून आले.सवर्ण जाती आणि अनूसूचित जाती या दोन्ही जातीतील स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा पुरूषांच्या बरोबरीने सुधारलेला नाही. सवर्ण जातीचे लोक आपल्या मुलींना विवाहाचे वय होईपर्यंतच शिकवितात. त्यानंतर त्या मुलीला शिकण्याची इच्छा असली तरी विवाहाच्या बंधनात अडकवतात. सवर्ण जातीच्या कांही कुटुंबातच उच्च शिक्षण घेतलेल्या मुली आढळून आल्या. अनुसूचित मुलींच्या शिक्षणाकडे पूर्णतः दुर्लश्र केले आहे. आज १ ली च्या वर्गात अनुसूचित जातीची एकही मुलगी नाही. म्हणजेच अनुसूचित जातीचे लोक महिलांना निम्न लेखतात असे दिसून आले.

**धार्मिक स्थिती :**सवर्ण जाती आणि अनुसूचित जातींमध्ये धार्मिक स्थितीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, गावातील सार्वजनिक मंदिरात अनुसूचित जातीच्या लोकांना आजही प्रवेश दिला जात नाही. जातीय विषमतेमुळेच सवर्ण जातीचे लोक अनुसूचित जातीच्या लोकांना मंदिरात प्रवेश करण्यास मनाई करतात. सण, उत्सवाच्या वेळी सुद्धा या दोन्ही जाती एकत्र येत नाहीत. गावात वर्षातून एकदा हरीनाम सप्ताह साजरा केला जातो. या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी गावजेवण असते. अनुसूचित जातीच्या लोकांना भोजनासाठी फक्त आमंत्रित केले जाते. गावातील सर्व लोकांचे भोजन झाल्यानंतर पत्रावळ्या काढण्याचे काम आजही अनुसूचित जातीचेच लोक करतात. अनुसूचित जातीचे लोक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना सवर्ण जातीचे लोक तिकडे फिरकत देखील नाहीत. असे दिसून आले.

**राजकीय स्थिती :**गावातील अनुसूचित जातीने शैक्षणिक प्रगती केली नसल्यामुळे त्यांचा राजकारणात इतकाही सहभाग नसल्याचे दिसून आले. अनुसूचित जातीमधील एक व्यक्ती आतापर्यंत फक्त उपसरपंच झालेली आहे. एक-दोन व्यक्ती ग्रामपंचायतीचे सदस्य झाले आहेत. अनुसूचित जातींच्या महिलांचा अद्यापही राजकारणात सहभाग नाही.

**सारांश आणि निष्कर्ष :**कालकुंद्री गावाला जातीय विषमतेचे कीड लागलेली आहे. असे संशोधकाला संशोधनातून दिसून आले. गावातील व्यक्तीचा दर्जा तिच्या जातीवरून व लिंगावरून ओळखला जातो. म्हणजेच गावात जातीभेद व लिंगभेद पाळला जातो. सवर्ण जातीने आपली शैक्षणिक प्रगती करत असतांना सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावला आहे. परंतु अनुसूचित जातीचा शैक्षणिक दर्जा सुधारला नसल्याने सामाजिक दर्जा हा निम्न स्वरूपाचा आहे. दोन्ही जातींमध्ये स्त्रियांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारलेला नाही.

**निष्कर्ष :**

१) गावात जातीय अस्पृश्यता पाळली जाते.

२) अनुसूचित जातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

३) सवर्ण जाती व अनुसूचितीतील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसून त्यांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावलेला नाही.

४) गावात जातीभेद व लिंगभेद पाळला जातो.

५) अनुसूचित जातीच्या लोकांना गावातील मंदीरात जाण्यास प्रवेश दिला जात नाही व सार्वजनिक ठिकाणी असलेल्या विहींरीवर पाणी ओढण्यास मनाई केली जाते.

६) सवर्ण जातीचे लोक अनुसूचित जातीच्या घरातील पाणी व भोजन घेत नाहीत.

७) गावातील एकूण लोकसंख्येत पुरूषांपेक्षा स्त्रियांची संख्या अधिक आहे.

८) गावातील उच्च शिक्षण घेतलेल्या मुलींना स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नाही.

**संशोधकाचे मत :**

१) गावात शिक्षणाचा प्रसार करून जातीय विषमता नष्ट केली पाहिजे.

२) अनुसूचित जातीकडे व गावातील महिलांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलून त्यांच्याकडे माणूस म्हणून पाहिले पाहिजे.

३) स्त्रियांना पुरूषांबरोबरीचा दर्जा दिला तरच स्त्री-पुरूष समानता येऊ शकेल.

४) स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

५) अनुसूचित जातीच्या लोकांना गावातील मंदिरात प्रवेश दिला पाहिजे आणि सार्वजिनक ठिकाणी असलेल्या विहीरीवर पाणी ओढण्यास परवानगी दिली पाहिजे.

**संदर्भ सूची :**

१) www.marathivishvakosh.com

२) www.misalpav.com

३) २००१ चा कालकुंद्री ग्रामपंचायतीतून उपलब्ध झालेला अहवाल.

४) गावातील प्राथमिक शाळेतून उपलब्ध झालेला अहवाल.

५) २००१ च्या जनगणनेनुसार उपलब्ध झालेला अहवाल.